लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP

सांज दैनिक : शुक्रवार - ८ सप्टेंबर २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १५७
पाने - ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822

संपादक: अशोक चिंचोले
epaper.dainikbhukamp.com



लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
GET IT ON Google Play
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.
जिथं प्रवासाची व्याख्याच बदलते
Online Booking : www.vishwatravels.in


# ११ ते १७ सप्टेंबर दरम्यान मराठवाडा मुक्तीसंग्राम सप्ताह

## गौरव रॅली काढून हुतात्म्याच्या परिवाराचा गांधी टोपी, पंचा देऊन करणार सत्कार




लातूर : मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा प्रशासनाच्या वतीने ११ ते १७ सप्टेंबर २०२३ दरम्यान जिल्हाभरात मराठवाडा मुक्तीसंग्राम सप्ताह विविध उपक्रमाने साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सप्ताहभरात लातूर जिल्ह्यातील हैद्राबाद मुक्ती संग्रामातील ऐतिहासिक वारसा स्थळांना हुतात्मा स्मारकांना भेटी देणे, तिथे श्रमदान करणे, जिल्ह्यातील सर्व हुतात्मा स्मारकाची डागडूजी करणे, प्रत्येक हुतात्मा स्मारक ते हुतात्म्यांच्या घरापर्यंत गौरव रॅली काढून हुतात्म्यांच्या परिवाराचा गांधी टोपी व पंचा देऊन सत्कार करणे, जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रत्येक दिवशी प्रार्थनेपूर्वी मराठवाडा गीत गायन करणे, चित्ररथ, पोस्टर, भित्तीपत्रके, रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रक्तदान शिबीरे, स्वच्छता रॅली, वृक्ष लागवड, स्वातंत्र्य सैनिक ज्या शाळेमधून शिकले त्या शाळांनी त्यांच्या नावाची यादी शाळेच्या भिंतीवर ठळकपणे लिहणे आदी उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लातूर येथील हुतात्मा स्मारकात मराठवाडा मुक्ती संग्रामाशी संबंधीत खुले संग्रहालय हे मराठवाडा मुक्ती संग्राम दरम्यान लातूर जिल्ह्यामध्ये लढाई झालेल्या गंजगोलाई लातूर, बोटकूळ ता. निलंगा, हत्तीबेट ता. उदगीर, रामघाट ता. उदगीर, कौळखेड ता. उदगीर, तिरूका, घोणशी ता. जळकोट, औराद शहाजानी, हाडोळी ता. निलंगा, तोंडचिर ता. निलंगा व उदगीर या बारा ठिकाणी घटना व व्यक्तीची माहिती सांगणारे शिलाफलक तोंडचिर येथे प्रवेशद्वार, हुतात्मा स्मारकाची डागडूजी, रंगरंगोटी आदी कामे. जिल्हा नियोजन समिती मधून करण्यात येणार आहेत. ही तालुक्यात १४ ऑगस्ट पासून १७ सप्टेंबरपर्यंत विविध सांस्कृतीक कार्यक्रम होत आहेत अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.

या पत्रकार परिषदेस जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, जि. प. उपमुख्य कार्य अधिकारी नितीन दाताळ, शिक्षणाधिकारी मापारी, वंदना फुटाणे आदी उपस्थित होते.

### कव्हा शिवारातील तलाव रंकाळा धर्तीवर विकसीत करणार

लातूरच्या शेजारी कव्हा शिवारात असलेला कातपूर तलाव कोल्हापूर येथील रंकाळा तलावाच्या धर्तीवर विकसीत करून पर्यटकांसाठी आकर्षण केंपद्र निर्माण करणे, वडवळ येथील संजीवनी बेटावरील औषधी वनस्पतीचे संरक्षण करण्यासाठी केंद्र, देवणी गोवंश व जानवळ परिसरातील पश्मी श्वान वंश संवर्धन, लातूर येथे आरोग्य विभागासाठी प्रशिक्षण केंद्र, जिल्हा रूग्णालयासाठी कृषी महाविद्यालय नांदेड रोड येथील जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण करत लातूर विमानतळाच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण केली. चाकूर एमआयडीसी विकसीत करणे, वॉटरग्रीड योजनेची अंमलबजावणी आदीसाठी प्रस्ताव तयार असून ते १६ सप्टेंबर रोजी औरंगाबाद येथे होणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीसमोर ठेवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी दिली.



## विखे पाटील यांच्यावर भंडारा टाकून धनगर समाज कार्यकर्त्यांच्या घोषणा

सोलापूर : रात्री सोलापूर मुक्कामी असलेले राज्याचे महसूलमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना येथील विश्रामगृहात निवेदन देण्याच्या निमित्ताने आलेल्या धनगर समाजातील कार्यकर्त्यांनी निवेदन देत असतानाच विखे पाटील यांच्या डोक्यावर भंडारा टाकला. त्या क्षणी तिथे उपस्थित असलेल्या भाजपा कार्यकर्ते व सुरक्षा रक्षकांनी त्या कार्यकर्त्यास मारहाण केली. तेंव्हा धनगर समाजाला एस. टी. चे आरक्षण मिळालेच पाहिजे. येळकोट येळकोट जय मल्हार अशा घोषणा देत असताना धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांना बाहेर आणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला.

राज्यामध्ये मराठा आरक्षणाचा विषय गाजत असताना चार दिवसांपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थळ असलेल्या चौंडी, जि. अहमदनगर येथे यशवंत सेनेच्या वतीने धनगर समाजाच्या अनुसूचीत जमाती निर्णयाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी उपोषण चालू आहे. या उपोषणाला राज्यभरातून विविध ठिकाणाहून धनगर समाजाचे कार्यकर्ते पाठिंबा देत आहेत. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील हे सोलापूर विश्रामगृहात मुक्कामी होते.

आज शुक्रवार रोजी सकाळी त्यांना निवेदन देण्यासाठी धनगर समाजाचे कार्यकर्ते गेले. निवेदन ना. विखे पाटील हे वाचत असताना शेखर बंगाळे आणि इतर कार्यकर्ते आले होते. शेखर बंगाळे यांनी शर्टाच्या उजव्या खिशातील भंडाऱ्याचा पुडा काढून तो विखे पाटील यांच्या डोक्यावर टाकला व धनगर समाजाला एस. टी. प्रवर्गाचे आरक्षण मिळालेच पाहिजे अशा घोषणा दिल्या. सोलापुरातील या आंदोलनानंतर राज्यभरात देखील धनगर समाज कार्यकर्त्यांकडून धनगर समाजाच्या आरक्षण मागणी संदर्भात पाठिंबा दिला जात आहे.

दरम्यान, भाजपाचे आ. गोपीचंद पडळकर यांनी भंडाऱ्याचा उपयोग आंदोलनासाठी करणे अयोग्य असल्याचे मत व्यक्त करून ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर भंडारा उधळला. मी विनंती करतो की, विखे पाटील यांनी भंडारा खंडोबाचा, बिरोबाचा, महाकुबाईचा आर्शीवाद समजून कपाळाला लावावा, असे आवाहन केले.

## काठीने वार, वडीलाकडून मुलाचा खून; गुन्हा दाखल

औसा : औसा तालुक्यातील मौजे दावतपूर येथे घरगुती भांडणावरून ७८ वर्षे वयाच्या वडिलाने ४८ वर्षे वयाच्या मुलास काठीने मारहाण केली. त्यात मुलाचा मृत्यू झाला. या प्रकरणी किल्लारी पोलिसांत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मौजे दावतपूर, ता. औसा येथे बिराजदार कुटुंबीय राहते. २ सप्टेंबर रोजी रात्री किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला. यात विनायक नागनाथ बिराजदार (वय ७८) रा. दावतपूर यांनी हातातील काठीने महादेवा विनायक बिराजदार (वय ४८) यास पोटावर, डोक्यावर काठीने वार केला. त्यात महादेवा गंभीर जखमी झाला व मरण पावला. या प्रकरणी पार्वती महादेवा बिराजदार यांच्या फिर्यादीवरून विनायक बिराजदार यांच्या विरोधात किल्लारी पोलिसांत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किल्लारी पोलीस या प्रकरणी अधिक चौकशी करत आहेत. २९ सप्टेंबर रोजी रात्री घराच्या पाठीमागील दारासमोर किरकोळ वादानंतर वडिलाने मुलाला काठीने मारहाण केली. त्यात मुलाचा मृत्यु झाला.

## तर उद्यापासून सलाईन, पाणी बंद- मनोज जरांगे

जालना : सरकारकडून अद्याप कुठलाही निरोप आला नाही. आमची लढाई सुरू आहे. आम्ही आमच्या शब्दावर ठाम आहे. शांततेत लढाईचे व्यापक स्वरुप होईल. आम्ही सरकारशी चर्चा करायला तयार आहोत. मंत्रालयात जाण्यासाठी पिशव्या भरून ठेवल्यात. परंतु निरोप अजून येत नाही. आम्ही २ पाऊले मागे येतोय. माझ्या शब्दावर मी ठाम आहे. जर सरकारने पुढे काही केले नाही तर पाणी त्याग आणि उपचार बंद होतील असा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

मराठा समाजातील आंदोलकांना मनोज जरांगे यांनी आवाहन केले आहे की, राज्यातील मराठा बांधवांनी आंदोलनाला ताकदीने पाठिंबा दिला आहे. मराठा आरक्षणाला यश येण्याची शक्यता अधिक आहे. मराठा समाजाने आंदोलन करावे, पाठिंबा वाढवावा परंतु कुठेही आंदोलनाला गालबोट लागणार नाही ही काळजी घ्यावी. मराठा समाजातील तरुणांनी कुणीही टोकाचे पाऊल उचलू नये. आत्महत्येसारखा प्रकार करू नये. आम्ही इथं तुम्हाला न्याय देण्याची जीवाची बाजी लावलीय. जर तुम्ही असे काही पाऊल उचलले तर आम्ही हा लढा कुणासाठी उभारतोय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



त्याचसोबत आरक्षणाचा फायदा प्रत्येक मराठा समाजातील मुलांना होणार आहे. यापुढील काळात आत्महत्येचे प्रकार करू नये. माझ्यावर विश्र्वास ठेवा, उग्र आंदोलन करू नये. आत्महत्या करू नये. कुणावरही गुन्हे दाखल होऊ नये. शांततेत लोकशाही मार्गाने आंदोलन करावे ही माझी सर्वांना विनंती आहे. तरीही कुणी तोडफोड करत असेल तर ते आमचे कार्यकर्ते नाहीत, मराठा समाजाचे नाहीत. वाशिमसारख्या ठिकाणी आजही बंद आहेत. बीडमध्ये चक्का जाम झाले आहे. आंदोलन शांततेत व्हायला हवे. कायदा सुव्यवस्था बिघडेल असे कृत्य करू नका, मीडियाच्या माध्यमातून लोकांपर्यंत संदेश पोहचवतोय. न्याय मिळणार आहे, वाढता पाठिंबा ठेवा, आंदोलन लोकशाही मार्गाने करा असं आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

## किरकोळ अनैतीक व्यापारावर धाड ठोक अनैतीक व्यापारास मोकळीक

लातूर : लातूर एमआयडीसी पोलिसांनी आपल्या हद्दीत चालू असलेल्या अनैतीक व्यापारस्थळी धाड टाकून एका महिलेवर कारवाई करून, एका पिडीतेची सुटका केली, पण एकाचवेळी, एका ठिकाणी १५ ते १६ मुली, महिलांना बोलावून मोठ्या प्रमाणात चालू असलेल्या अनैतीक व्यापारास मोकळीक दिली आहे.

एमआयडीसी पोलिसांनी दिपज्योती नगर परिसरात स्वतःच्या फायद्यासाठी बाहेरील महिलांना, पुरूषांना घरी बोलावून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करवून घेत असताना कारवाई केली आहे. मात्र, लातूर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तीन मजली (खास अनैतिक व्यापारासाठी रचना करून बांधलेली इमारत) इमारतीत एकावेळी १०-१५ महिला, मुलींना बोलावून पाच-दहा कारमधून, बुलेटवरून येणाऱ्या पुरूषांची सोय करून अनैतीक व्यापार मोठ्या प्रमाणात चालू ठेवण्यास मोकळीक देण्यात आली असून त्यांच्यावर मात्र पोलीस कोणतीच कारवाई करित नाही, अशी शोकांतिका आहे.

### त्यांच्या मते....

■ ईतके वर्ष राजकारणात जाणता राजा म्हणून वावरलात मराठा आरक्षणासारखा प्रश्न का सोडविला नाहीत.
- राधाकृष्ण विखे पाटील

शंका रास्तच आहे की?

■ घटना दुरूस्ती केल्याशिवाय मराठा आरक्षण प्रश्न सुटणार नाही.
- अशोक चव्हाण

आरक्षणाचा चेंडू शेवटी केंद्राच्याच कोर्टात.

■ धनगर समाज आज संक्रमण अवस्थेतून जातोय. अशावेळी आरक्षण विषयात संवादावरती भर ठेवला पाहिजे.
- निलम गोऱ्हे

आंदोलन, जाळपोळ, हिंसक आंदोलन, आत्मघात करून घेतल्याशिवाय शासन संवादच साधत नाही.


■ ओबीसी-मराठा यांच्यात भांडण लावण्याचे काम सरकार करित आहे, ओबीसी आग आहे. या भानगडीत सरकारने पडू नये.
-नाना पटोले

आरक्षण देतो म्हणून मते घेतली, आता 'आग' म्हणून पळता येणार नाही.

## निवडणूक शपथपत्र; फडणवीस दोषमुक्त

नागपूर : निवडणूक शपथपत्रात दोन गुन्ह्यांची नोंद नसल्याचं प्रकरणात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोषमुक्त झाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधातील दोन गुन्हे हे खाजगी स्वरुपाच्या होत्या. जे गुन्हे लपवले त्याचा निवडणुकीवर कोणताही परिणाम होणार नसल्याने फडणवीसांना दोषमुक्त करण्यात आलं आहे. या सुनावणीसाठी देवेंद्र फडणवीस हे ऑनलाईन पद्धतीने न्यायालयीन कामकाजात सहभागी झाले होते.

वकील सतीश उके या प्रकरणात तक्रारदार त्यांनी याचिका दाखल केली होती. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद पूर्ण झाला होता. या प्रकरणाचा निकाल ५ सप्टेंबर रोजी सुनावला जाणार होता. परंतु न्यायालयाने निकालाची तारीख ही ८ सप्टेंबर निश्र्चित केली. अखेर नागपूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयातील प्रथम श्रेणी



न्यायदंडाधिकाऱ्यांनी देवेंद्र फडणवीस यांना दोषमुक्त केलं.

देवेंद्र फडणवीस यांच्या २०१४ मधील विधानसभा निवडणुकीच्या शपथपत्रात दोन गुन्हे नमूद न केल्याप्रकरणी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीसाठीच्या उमेदवारी अर्जासोबतच्या शपथपत्रात दोन गुन्हे नजरचुकीने नमूद करायचे राहिल्याचं देवेंद्र फडणवीस यांच्यावतीने त्यांच्या वकिलांनी न्यायालयासमोर सांगितलं होतं.

पहिली तक्रार ही बदनामीच्या गुन्ह्यासंदर्भातील (क्रिमिनल डिफेमेशन) संबंधित आहे. त्यावेळी फडणवीस हे नगरसेवक होते. त्यांनी एका सरकारी वकिलाविरुद्ध काही तक्रारी केल्या होत्या. त्यांना त्या खटल्यातून दूर करण्यात यावे, अशी मागणी करणारे एक प्रसिद्धीपत्रक त्यांनी काढले होते. त्यावर त्या वकिलाने 'क्रिमिनल डिफेमेशन' दाखल केले. नंतर त्याच वकिलांनी ते परत घेतले.

दुसरे प्रकरण एका झोपडपट्टीवासियांसाठी आंदोलन करतानाचे आहे. एका जागेवर असलेल्या झोपडपट्टीला मालमत्ता कर लावण्यात यावा, असे पत्र फडणवीस यांनी नगरसेवक म्हणून महापालिकेला दिले होते. त्यानुसार, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मालमत्ता कर लावला. ती जमीन खाजगी असून आपल्या मालकीची आहे, अशी खाजगी अशी खाजगी तक्रार एका व्यक्तीने केली होती. पुढे ही तक्रार उच्च न्यायालयाने फेटाळली.



### क्रीडामंत्री ना. संजय बनसोडे यांची विनम्रता

बदलत्या राजकीय परिस्थितीत उदगीरचे आ. संजय बनसोडे यांनी राष्ट्रवादीतील अजित पवार गटासोबत गेले. ते राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्रीही झाले. काल राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या कार्याध्यक्षा (शरद पवार गट) खा. सुप्रियाताई सुळे या लातूर दौऱ्यावर आल्या असता ना. संजय बनसोडे यांनी अत्यंत विनम्रपणे खा. सुप्रियाताई यांचे स्वागत केले.

# UPI ATM मधून पैसे काढणे आहे खूप सोपे, ही आहे संपूर्ण प्रक्रिया

काळासोबत तंत्रज्ञानही प्रगत होत आहे. बँकिंग क्षेत्र देखील यापासून अस्पर्शित नाही. यामुळेच देशात पहिले UPI ATM सुरू करण्यात आले आहे. आता यूपीआयच्या मदतीने ग्राहक डेबिट किंवा एटीएम कार्डशिवायही एटीएममधून पैसे काढू शकणार आहेत. यूपीआय एटीएम सुविधा सुरू झाल्यानंतर पैसे काढण्याची मर्यादाही वाढणार असल्याचे बोलले जात आहे. याशिवाय णझख एटीएम कार्ड स्किमिंगसारख्या आर्थिक फसवणुकीला आळा घालण्यासही मदत करेल. चला तर मग जाणून घेऊया UPI ATM मधून




व्यवहार कसा होईल.

जर तुम्हाला UPI ATM मधून पैसे काढायचे असतील तर खाली दिलेली प्रक्रिया काळजीपूर्वक वाचा.

ग्राहकाने प्रथम एटीएम स्क्रीनवर 'णझख रोख पैसे काढणे' पर्याय निवडणे आवश्यक आहे. यानंतर, ग्राहकाला त्याला काढायची असलेली रक्कम टाकावी लागेल. त्यानंतर रक्कम टाकल्यानंतर सिंगल यूज डायनॅमिक क्यूआर कोड एटीएम स्क्रीनवर दिसेल. यानंतर ग्राहकाला णझख ॲप वापरून ठठ कोड स्कॅन करावा लागेल. आता ग्राहक एटीएममधून रोख प्राप्त करण्यासाठी मोबाइलवर UPI पिन वापरून व्यवहार अधिकृत करावा लागेल.

UPI ATM हा कार्डलेस व्यवहाराचा एक प्रकार आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी तुम्हाला तुमचे कार्ड घेऊन जाण्याची गरज नाही. याच्या मदतीने तुम्ही एकावेळी १०,००० रुपयांपर्यंतचे व्यवहार करू शकता. तुमची इच्छा असल्यास, तुम्ही UPI APP वापरून अनेक खात्यांमधून पैसे काढू शकता.

खरं तर, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी द वर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये फिनटेकचे प्रभावशाली व्यक्ति रविसुतांजनी UPI वापरून एटीएममधून पैसे कसे काढायचे हे दर्शवत आहेत. त्याचवेळी, ऑगस्ट महिन्यात यूपीआयच्या माध्यमातून १० अब्ज रुपयांपेक्षा जास्त व्यवहार झाल्याची बातमी समोर आली होती.




# MBA पास व्यक्तीने गावात सुरू केला कडकनाथ कोंबडीचा व्यवसाय, करत आहे लाखोंची कमाई

कुक्कुटपालन, मत्स्यपालन यांसारख्या व्यवसायातून फारशी कमाई होत नाही, असे बहुतेकांना वाटते. पण असे नाही. आता सुशिक्षित तरुणही पोल्ट्री आणि मत्स्यपालन व्यवसायात हात आजमावत आहेत. त्यामुळे त्या तरुणांची कमाईही वाढली आहे. ते आता पूर्वीपेक्षा अधिक आनंदी जीवन जगत आहेत. पण आज आपण अशा व्यक्तीबद्दल बोलणार आहोत ज्याने एमबीए उत्तीर्ण झाल्यानंतर चांगल्या कंपनीत नोकरी करण्याऐवजी कुक्कुटपालन सुरू केले. आज एमबीए पास व्यक्ती या व्यवसायातून चांगली कमाई करत आहे.

खरं तर, आम्ही ज्या एमबीए पास व्यक्तीबद्दल बोलत आहोत ती बिहारच्या गया जिल्ह्यातील परैया बाजारची रहिवासी आहे. त्याचे नाव कुमार गौतम. कुमार गौतम याने बनारस हिंदू विद्यापीठातून एमबीए पूर्ण केले आहे. त्यानंतर त्याने सरकारी शाळेत शिकवायला सुरुवात केली. सध्या तो महमदपूर गावात असलेल्या महमदपूर मिडल स्कूलमध्ये शिक्षक आहे. मुलांना शिकवण्यासोबतच तो कडकनाथ कोंबडी आणि बटेराचा व्यवसायही करत आहे. त्याने आपल्या घरी कडकनाथ कोंबडी आणि लहान पक्षी पाळण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे ते स्वत: कोंबडी आणि लहान पक्षी यांना अन्न आणि पाणी देतात. त्यासाठी त्यांनी कोणताही वेगळा मजूर ठेवलेला नाही.

कुमार गौतम याचे म्हणणे आहे की, यापूर्वी त्याला कडकनाथ कोंबडीबद्दल कोणतीही माहिती नव्हती. त्याचे मांस इतके महाग विकले जाते, हे त्याला माहीत नव्हते. पण, कडकनाथ कोंबडीला जीआय टॅग मिळाल्यानंतर ते प्रसिद्धीच्या झोतात आले. त्यामुळे बाजारात त्याची मागणी वाढू लागली. अशा परिस्थितीत त्याने कडकनाथ कोंबडी पाळण्यास सुरुवात केली.

दिल्ली-मुंबईसारख्या महानगरांमध्ये कडकनाथ कोंबडीचे मांस १८०० रुपये किलोने विकले जाते. कोंबडी पाळण्यासाठी मध्य प्रदेशातून कडकनाथ कोंबडीची पिल्ले आणल्याचे गौतमने सांगितले. तेवढ्यात ५५ रुपयांना एक पिल्लू आले. विशेष म्हणजे कडकनाथ कोंबडी ३५ ते ४० दिवसांत तयार होते.

कडकनाथ कोंबडीशिवाय ते लहान पक्षीही पाळतात. लहान पक्षी अंड्यांबरोबरच ते लावेचे मांसही विकत आहेत. लहान पक्ष्यांची पिल्लेही ४० ते ४५ दिवसांत तयार होतात. त्यानंतर ते विकतात. आता कुमार गौतम कडकनाथ कोंबडा आणि लहान पक्षी पाळून चांगली कमाई करत आहेत. तो वर्षभरात लाखो रुपये कमावतो. आगामी काळात हा व्यवसाय आणखी वाढवण्याचा त्याचा विचार आहे.

**भारतात फार मोठ्या प्रमाणावर शेतजमीन असली तरी ती पूर्ण शेत जमीन पूर्णपणे वापरा खाली येत नाही. त्यातील फार मोठी जमीन ही उत्पादन क्षमता असूनही लागवडीखाली येत नाही ही फार मोठी शोकांतिका आहे. उत्पादनक्षमता असणारी पूर्ण शेत जमीन लागवडीखाली आणणे हे शेती क्षेत्रासमोरील मोठे आव्हान आहे. उपलब्ध असलेली सर्व जमीन लागवडीखाली आणायची म्हटल्यावर आवश्यक असतो तो मजुरांचा ताफा. आज अनेक कारणांमुळे मजुरांची अडचण निर्माण होते, त्यांची उपलब्धता न झाल्यास शेतकर्याला व्यापारी दृष्टी डोळ्यासमोर ठेवून उत्पादन करता येत नाही.**



# जमिनीची शोकांतिका!

भारतात उदरनिर्वाहक स्वरूपाची शेती केली जाते किंवा या शेतीमध्ये व्यापारी शेतीचा अथवा व्यापारी तत्त्वाचा अभाव दिसून येतो असे खेदाने म्हणावे लागते. अनेक मोठे शेतकरी आपल्याकडे असलेल्या सर्व जमिनिपैकी किंवा अस्तित्वात असणार्या साधन संपत्तीचा पूर्णपणे वापर करून व्यापारी तत्त्वावर शेती करून मोठे उत्पादन घेतात. त्याचा त्यांना आर्थिक मोबदला मिळतो, पण ही प्रवृत्ती सर्व शेतकर्यांमध्ये दिसून येत नाही. अनेक शेतकरी विविध कारणांमुळे आपली बरीचशी शेतजमीन पडीत स्वरूपात ठेवतात. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी काही कालावधीसाठी शेतजमीन पडीत ठेवणे स्वागतार्ह आहे, पण या कारणाशिवाय अनेक प्रकारे शेतकरी आपली जमीन पडीत स्वरूपात ठेवतात किंवा कुटुंबाला वर्षाकाठी पुरेल इतकेच उत्पन्न ते काढण्याचा प्रयत्न करतात.

भारती शेतकरी म्हटल्यावर डोळ्यासमोर येते ते त्यांचे मोठे कुटुंब, मोठे घर, मोठा कारभार, घरात असणारी मोठी सदस्य संख्या, त्यामुळे अनेक शेतकरी फक्त कुटुंबाला वर्षासाठी पुरेल इतके अन्नधान्य तयार करण्यासाठी प्राधान्य देतात. पूर्वी भारतातील ग्रामीण भागात बारा बलुतेदार पद्धती अस्तित्वात होती, त्यामध्ये वस्तू व सेवांची देवाण-घेवाण करून गरजा पूर्ण करण्याची पद्धत प्रचलित होती. त्यामुळे गरजेपेक्षा जास्त शेती उत्पादन शेतकरी शक्यतो करत नसे. काळानुरूप जसजसे सामाजिक बदल होत गेले तस तसा वस्तुविनिमयाचा अंत होत गेला. त्याप्रमाणे शेतकर्यांनी आपल्या उत्पादन क्षमतेत व्यापारी तत्वाचा अवलंब करणे अपेक्षित होते, परंतु त्या प्रमाणात ते घडले नाही. दिवसेंदिवस ज्या वेगाने बाजारपेठांचा विकास होणार होता त्या वेगाने तो झालेला नाही.

अगदी खेड्याच्या पातळीवर आजही बाजारपेठांच्या सोयी पोहचलेला नाहीत. तालुक्याच्या अथवा जिल्ह्याच्या पातळीवर माल आणून विक्री करणे हे आजही शेतकर्याला कंटाळवाणे व त्रासदायक वाटते. बाजारपेठेत वस्तू आणताना वाहतुकीतील अनेक अडथळे आडवे येतात. त्यांच्यावर कशीबशी मात करून तो शेतमाल बाजारात येतो. त्यात बाजारपेठेत प्रचलित असणार्या चुकीच्या पद्धतीमुळे शेतकरी नाडला जातो म्हणून तो गरजेपेक्षा जास्त उत्पादन करण्याच्या फंदात पडत नाही. उपलब्ध असलेली सर्व जमीन लागवडीखाली आणायची म्हटल्यावर आवश्यक असतो तो मजुरांचा ताफा. आज अनेक कारणांमुळे मजुरांची अडचण निर्माण होते, त्यांची उपलब्धता न झाल्यास शेतकर्याला व्यापारी दृष्टी डोळ्यासमोर ठेवून उत्पादन करता येत नाही.

विविध पायाभूत सुविधांचा विकास ग्रामीण भागात आजही तुरळक अपवाद वगळता झालेला नाही. जसे प्रसिद्धी माध्यमांचा ग्रामीण भागात विकास, रस्ते, लोहमार्ग, संपर्क यंत्रणा इत्यादी पायाभूत सुविधांचा विकास ज्या वेगाने व्हायला हवा होता त्या वेगाने तो ग्रामीण भागात झालेला दिसून येत नाही. त्यामुळे त्याचा उत्पादकतेवर विपरीत परिणाम होतो. तसेच उत्पादित झालेल्या मालाला चांगला बाजारभाव मिळेलच याची खात्री आपण देऊ शकत नाही. तसेच शासनाकडून चांगला हमीभाव मिळण्यातही अडचणी येतात. त्यामुळे शेतकरी आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या गरजेपुरते शेती उत्पादन करून व्यापारी दृष्टिकोनाचा त्याग करतो असे दिसून येते. सीमांत शेतकरी किंवा लहान शेतकरी आज आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर करून शेती उत्पादन घेताना दिसून येतात, पण त्याने अर्थव्यवस्थेत फारसा फरक पडत नाही. फार मोठी शेतजमीन असणार्या शेतकर्यांची संख्यादेखील भारतात चांगलीच आहे. त्यांचा सांपत्तिक दर्जादेखील खूपच चांगला आहे.

आधुनिक काळात इतर अनेक उद्योगांचा विकास मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. अनेक ठिकाणी औद्योगिक वसाहती स्थापन झाल्या. तेथे अनेक तरुणांना रोजगार प्राप्त झाला. शेतीपूरक उद्योग कुटीर उद्योग यांचादेखील चांगला विकास झाला. शहरी वातावरणाचे जसजसे ग्रामीण लोकांना आकर्षण वाटू लागले तस तसे शेती करण्याचे प्रमाण आणखी कमी झाले. त्यामुळे आजची शेती ही उदरनिर्वाह शेती होऊ लागली. आजच्या शेतीमध्ये व्यापारीकरणाचा अभाव दिसून येतो. व्यापारीकरणाचे तत्व भारतातील सर्व शेतकरी स्वीकारत नाहीत तोपर्यंत भारतीय शेतीचा विकास होत नाही. किंबहुना भारतातील सर्व शेतकर्यांनी व्यापारी तत्त्वावर शेती केली किंवा शेतीत व्यापारी तत्व स्वीकारले तर भारतातील कृषी उत्पादकता वेगाने वृद्धिंगत होईल या शंका नाही.

**-प्रा.डॉ. कृष्णा शहाणे**
(लेखक अर्थतज्ञ आहेत)

# मेनोपॉज केयर महिलांची गरज!



मेनोपॉज म्हणजेच रजोनिवृत्तीच्या संबंधित उद्भवणार्या विविध समस्यांमुळे गेल्या काही वर्षांत ४० ते ५० वयोगटातील महिलांचे नोकरी सोडण्याचे प्रमाण वाढल्याचे अमेरिकेतील मेयो क्लिनिकने केलेल्या संशोधनातून दिसून आले आहे. मेनोपॉज अवस्थेचा हा काळ जास्तीत जास्त १० वर्षांचा असल्याने महिलेचा जेव्हा मेनोपॉज सुरू होतो, तेव्हापासूनच तिच्या कार्यपद्धतीवर त्याचा परिणाम दिसायला लागतो. यामुळे दरवर्षी १५ हजार कोटी रुपयांच्या उत्पादनांचे नुकसान होते. जे कंपनीला परवडणारे नाही. पण तरीही या महिलांचा कामाप्रती असलेला प्रामाणिकपणा विचारात घेऊन अमेरिकाच नाही, तर ब्रिटनमधल्या कंपन्यांनीही अनुभवी आणि कार्यक्षम असलेल्या या ज्येष्ठ महिलांना मेनोपॉज काळात सांभाळून घेण्याचा निर्णय घेतला आहे, जो खरंच कौतुकास्पद आहे.

कोविडनंतर संपूर्ण जगच बदललं असून सुदृढ आरोग्य किती महत्वाचं आहे याची जाणीव आता सर्वांनाच झाली आहे. याच पार्श्र्वभूमीवर, जगभरातील अनेक कंपन्यांनी विशेषकरून महिला कर्मचार्यांना आकर्षित करण्यासाठी नवीन नियमही लागू केले आहेत. यात कर्मचार्यांच्या आजारपणाचा परिणाम कामावर होऊ नये याकरिता अनेक कंपन्या वेगवेगळ्या पॅकेजेसची ऑफर देत आहेत. या सेवेत आता प्रामुख्याने महिला कर्मचार्यांना फर्टीलिटी ट्रीटमेंट्स, चाईल्ड केयर, एवढेच नाही, तर पॅरेंटल लिव बरोबरच आता मेनोपॉज केयरचीही ऑफर देणे कंपन्यांनी सुरू केलं आहे. विशेष म्हणजे ज्या कंपन्या महिलांना मेनोपॉज सेवा देत आहेत, त्यांचा बिझनेसही वाढत आहे. ही खरं तर नवीन सुरुवात असून मेनोपॉजमधून जाणार्या महिलांसाठी ही हॅपी सेकंड इनिंग ठरत आहे.

हे सगळं समजून घेण्यासाठी आधी आपल्याला मेनोपॉज म्हणजे काय हेच समजून घ्यावं लागेल. स्त्रीची वयाची पन्नाशी म्हणजेच मेनोपॉज. म्हणजेच रजोनिवृत्तीचा काळ. पण हा काळ जितका सोपा वाटतो तितका तो अजिबात तसा नाहीये. पाळी येणं ते पाळी जाणं यातला हा पिरियड प्रत्येक स्त्रीला आतून बाहेरून बदलून टाकतो. ज्याचे परिणाम तिच्या शरीराबरोबरच मनालाही भोगावे लागतात. पण विशेष म्हणजे तिच्या आजूबाजूला असणार्यांना पण त्याचा दणका बसतोच. वैद्यकीय भाषेत बोलायचं म्हंटलं तर या काळात तिच्या शरीरातील असंतुलित हार्मोन्स तिच्या सगळ्या वागण्या बोलण्याला कारणीभूत असतात.

बोलण्या वागण्या हसण्या खेळण्या किंचाळण्यावर उगाचाच खेकसण्यावर विसराळूपणावरही काय तर तिच्या बारीक सारीक गोष्टींवरही या वयात असंतुलित झालेल्या हार्मोन्सचा ताबा असतो. त्यामुळे आयुष्याचा हा टप्पा पार करताना तिला असंख्य बदलांचा सामना करावा लागतो. विशेष म्हणजे याच वयात तिने कुठे करिअरमधला उंच टप्पाही गाठलेला असतो. पण येथेच घात होतो. स्वत:च्या हुशारीवर या वयात मोठ्या पदावर पोहचलेली महिला मध्येच कर्मचार्यांवर विनाकारण बरसते, लहान सहान गोष्टींमध्ये चिडचिड करते. मध्येच एखाद्याचा पाणउतारा करते. ती नेहमी रागातच असते.

मध्येच एकांतात ढसाढसा विनाकारण रडते, फुल्ली सेंट्रल एसी ऑफिसमध्ये काम करताना बाकीचे कुडकुडत असताना तिला घाम फुटतो. कधी साडी, ब्लाऊज घामाने चिंब भिजतो. मिटींग सुरू असताना तिला सारखं सारखं लघुशंकेला जावं लागतं. यामुळे इतरजण तिच्यावर कुत्सितपणे हसतात. पण ती दुर्लक्ष करते. कारण हार्मोन्समुळे तिच्या डोक्याच्या केसापासून तिच्या पायाच्या नखापर्यंत तिच्या शरीरात अनेक बदल झालेले असतात. यामुळे तिच्याबरोबर काम कसं करायचं असा प्रश्न सहकार्यांना पडतो. ते रितसर ज्येष्ठांकडे जाऊन तिच्या वारंवार तक्रारी करतात. कारण आपल्याकडे स्त्रीच्या आयुष्यातला हा काळ समजून घेण्याची पद्धतच नाही. यामुळे स्त्रिया या विषयावर मोकळेपणाने बोलूही शकत नाहीत. आपल्याला नक्की काय होतंय हे बर्याच वेळा त्यांनाच कळत नाही.

यामुळे ही अवस्था समजून घेणार कोण, हा प्रश्न पडतो. घरातही तिच्या वागण्यातला फरक सगळ्यांना जाणवतो. पण त्याबद्दल तिच्याशी कोणीही बोलत नाही. यामुळे तिची आतल्या आत घुसमट होते. तिचं डोक फिरलंय असा शिक्का घरातले मारून मोकळे होतात. या सर्वांना कंटाळून ती मुक्त होण्याचा निर्णय घेते आणि एक दिवस रात्री घरी आल्यावर सांगते मी राजीनामा दिलाय. हे असंच सध्या अनेक कंपन्यांमध्ये काम करणार्या महिलांच्याबाबतीत घडत आहे. यामुळे गेल्या काही वर्षांत ४० ते ५० वर्षांच्या महिलांचे नोकरी सोडण्याचे प्रमाण वाढल्याचे अमेरिकेतील मेयो क्लिनिकने केलेल्या संशोधनात नमूद करण्यात आले आहे.

मेनोपॉज अवस्थेचा हा काळ जास्तीत जास्त १० वर्षांचा असल्याने महिलेचा जेव्हा मेनोपॉज सुरू होता तेव्हापासूनच तिच्या कार्यपद्धतीवर त्याचा परिणाम दिसायला लागतो. यामुळे दरवर्षी १५ हजार कोटी रुपयांच्या उत्पादनांचे नुकसान होते. जे कंपनीला परवडणारे नाही. पण तरीही या महिलांचा कामाप्रती असलेला प्रामाणिकपणा विचारात घेऊन अमेरिकाच नाही, तर ब्रिटनमधल्या कंपन्यांनीही अनुभवी आणि कार्यक्षम असलेल्या या ज्येष्ठ महिलांना मेनोपॉज काळात सांभाळून घेण्याचा निर्णय घेतला आहे, जो खरंच कौतुकास्पद आहे.

सगळ्यात आधी ब्रिटिश कंपनी पेपीने या महिलांना कार्यस्थळी मेनोपॉज सेवा देण्यास सुरुवात केली. एका ॲपच्या माध्यमातून तज्ज्ञ आणि थेरेपिस्ट या महिलांना मार्गदर्शन करतात. मन मोकळे करता येत असल्याने या महिलाही आता अधिक मन लावून काम करू लागल्या आहेत. ज्याचा रिझल्ट कंपनीच्या नफ्यातून दिसू लागला आहे. हळूहळू सगळेच देश याकडे वळतील यात शंका नाही, पण भारतात मुख्य म्हणजे महिलांशी संबंधित मेनोपॉज नावाचं काहीतरी असतं हेच किती जणांना ठाऊक आहे याचीच बोंब आहे. जसे आपण कपडे आणि खाण्यापिण्याबाबत पाश्चिमात्यांचे अनुकरण करतो तसे अशा काही चांगल्या बदलांचेही आज ना उद्या अनुकरण करू हे मात्र नक्की. तोपर्यंत महिलांनो स्वत:च स्वत:ला सांभाळा.

**-कविता लाखे**

# विमा कंपनीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई एक महिन्यात द्यावी

## -राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीचे आदेश

उस्मानाबाद : प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२२ मध्ये सोयाबीन पिकाच्या ९७ टक्के पुर्वसुचना ह्या क्रॉप कॅलेंडरनुसार १५ ऑक्टोबरपूर्वी प्राप्त झाले असल्याने मार्गदर्शक सूचनेतील मुद्दा क्रं.२१.५.१० लागू होत नाही.विमा कंपनीने ५०:५० भारांकन न लावता पंचनाम्यातील नमूद नुकसानीचे क्षेत्र आणि नुकसानीच्या टक्केवारीनुसार नुकसान भरपाई वितरीत करावी असे आदेश विमा कंपनीस जिल्हास्तरीय समिती व जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीच्या बैठकीमध्ये देण्यात आले होते.तरी देखील विमा कंपनीने कार्यवाही न केल्यामुळे शेतकऱ्यांनी विभागस्तरीय तक्रार निवारण समितीकडे अपिल केले होते.

या अपिलानुसार ८ फेब्रुवारी २०२३ रोजी विभागस्तरीय तक्रार निवारण समितीची सभा विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेत झाली.या सभेमध्येसुध्दा विमा कंपनीस मार्गदर्शक सूचनेतील मुद्दा लागू न करता व ५०:५० भारांकन न लावता उर्वरीत नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा करण्याबाबत तसेच पंचनाम्याच्या सर्व प्रती ८ मार्च २०२३ पर्यंत कृषि विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित केले होते.परंतु विमा कंपनीने विभागस्तरीय तक्रार निवारण समितीच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे शेतकऱ्यांनी राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे १० जुलै २०२३ रोजी अपिल केले होते. त्याअनुषंगाने १० ऑगस्ट २०२३ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीचे इतिवृत्त दिनांक १८/०८/२०२३ रोजी प्राप्त झाले आहे. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार विमा कंपनीने विभागस्तरीय तक्रार निवारण समितीच्या निर्णयातील मुद्दा क्रं.५ हा ग्राह्य धरुन उर्वरीत ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांना वितरीत करावी असे आदेशित केले होते.

तसेच दिनांक २४/०८/२०२३ रोजी अप्पर मुख्य सचिव(कृषि), यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय कृषी विमा कंपनीचे अधिकारी,कृषी विभागाचे अधिकारी,तक्रारदार शेतकरी आणि लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक घेण्यात आली.या बैठकीत निकाल दिला आहे. विमा कंपनीने मार्गदर्शक सूचनेतील काही मुद्दे लागू न करता व ५०:५० भारांकन न लावता उर्वरीत नुकसान भरपाई शेतकऱ्यांना एक महीन्याच्या आत अदा करावी.विमा कंपनीने पंचनाम्याच्या प्रती तात्काळ कृषी विभागास उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे आदेश दिले. विमा कंपनीने अपात्र केलेल्या नुकसानीच्या पुर्वसुचनाबाबत पुनश्च सखोल पडताळणी करुन त्यातून पात्र होणाऱ्या नुकसानीच्या पुर्वसूचनास विमा भरपाई अदा करावी.तसेच अपात्र होणाऱ्या नुकसानीच्या पुर्वसुचनाबाबत अपात्रतेच्या कारणासह स्वतंत्र अहवाल सादर करावा.असे निर्देश राज्यस्तरीय समितीच्या सभेत देण्यात आले.

# पाकपेक्षा भारतात जास्त बेरोजगारी

नवी दिल्ली : जगभरात महागाई वाढताना दिसत आहे आणि त्यासोबतच बेरोजगारीही वाढत आहे. जागतिक मंदीच्या भीतीमुळे बेरोजगारी वाढत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान पाकिस्तानपेक्षा भारतात अधिक बेरोजगारी असल्याची आकडेवारी आता समोर आली आहे.

पाकिस्तान कंगाल असल्याचे वृत्त अनेक वेळा समोर येत असते मात्र भारतात पाकिस्तानपेक्षा अधिक बेरोजगारी असल्याचे आता उघड झाले आहे. यात चीन-अमेरिकासह इतर देशही मागे आहे. कोरोना काळापासून जगभरातील देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. कोरोनामुळे जगाची अर्थव्यवस्था काहीशी संथ झाल्याचे पाहायला मिळत आहे. जगभरात महागाईही वाढता दिसत आहे. यासोबतच बेरोजगारीही वाढत असल्याचे चित्र आहे. संपूर्ण जग मंदीच्या भीतीच्या सावटाखाली जगत आहे. जागतिक मंदीच्या भीतीमुळे जगभरातील देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे.

कोविड महामारी आणि रशिया युक्रेन युद्धाचा जगाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. यामुळे जगात महागाई आणि त्यासोबत बेरोजगारी वाढत असल्याचे म्हटले जात आहे. वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्सच्या माहितीनुसार, जगातील सर्वाधिक बेरोजगारी असलेला देश दक्षिण आफ्रिका आहे. दक्षिण आफ्रिकेत बेरोजगारीचा दर ३२.६ टक्के आहे. बेरोजगारीच्या यादीत इराक दुस-या क्रमांकावर आहे. इराकमध्ये



बेरोजगारीचा दर १५.५५ टक्के आहे. सर्वाधिक बेरोजगारीच्या यादीत तिस-या क्रमांकावर बोस्त्रिया आणि हर्जेगोविना हे देश असून येथे बेरोजगारीचा दर १३.३ टक्के आहे. या यादीत अफगाणिस्तान चौथ्या आणि स्पेन पाचव्या क्रमांकावर आहे.

### रशिया-युक्रेन युद्धामुळे अर्थव्यवस्था कोलमडली

कोरोना महामारी आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे अनेक देशांसमोर आर्थिक आव्हानंही निर्माण झाली आहेत. अनेक देशांमध्ये मंदीची भीती व्यक्त केली जात आहे. महासत्ता अमेरिका, युके, जर्मनी यासारख्या देशांमध्ये मंदीची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे जागतिक मंदीची भीतीही व्यक्त केली जात आहे. परिणामी जगभरात बेरोजगारीमध्येही वाढ झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे कंगाल झालेल्या पाकिस्तानपेक्षाही भारतात बेरोजगारी वाढली आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## ॲसिडिटी किंवा सौम्य हृदयविकाराचा झटका मध्ये काय आहे अंतर



आजच्या काळात ॲसिडिटीची समस्या सामान्य झाली आहे. परंतु यासह एक मोठा आजार देखील जन्म घेत आहे, आणि तो आहे किरकोळ हृदयविकाराचा झटका. किंवा मायनर हार्ट अटैक. हे दोन्ही रोग गंभीर आजार आहेत. जर आपण या रोगाला समजून घेऊन त्यावर योग्य उपचार घेतले तर एखाद्याचा जीव वाचू शकतो,नाहीतर काही गंभीर आजार उद्भवू शकतात.उदाहरणार्थ, ॲसिडिटी जास्त असल्यावर रक्तदाब देखील वाढू शकतो. किरकोळ हृदयविकारामुळे हृदयरोगाचा धोका वाढू शकतो.या दोघांमध्ये फरक कसा करावा, ह्याची कोणती वेगवेगळी लक्षणे आहेत, आहारात काय बदल केले पाहिजे. या सामान्य दिसणाऱ्या आजाराबद्दल चेस्ट फिजिशियन डॉ. रवी दोसी यांच्याशी विशेष चर्चा केली. डॉ.काय म्हणाले ते जाणून घेऊ या?

ॲसिडिटी आणि सौम्य हृदयविकाराचा झटका यात फरक कसा करावा?

पोटात ऍसिडचे प्रमाण जास्त असल्यामुळे ॲसिडिटी वाढते.ॲसिडिटीमुळे पोटात वेदना आणि जळजळ होते. सौम्य हृदयविकाराच्या झटक्यात, हृदयातील एक शिरा अवरोधित होते,ज्यामुळे रक्त साकळून रक्ताची गुठळी तयार होते,रक्ताचा पुरवठा थांबतो आणि वेदना होतात हे दोघे वेगळे आहेत, दोघांचे पूर्णपणे वेगळ्या पद्धतीने उपचार केले जाते.

ॲसिडिटीआणि सौम्य हृदयविकाराची लक्षणे

ॲसिडिटीमुळे, छातीच्या मध्यवर्ती भागात दुखण्याची भावना जाणवते,ढेकर येतात,अपचनाची समस्या होते, शौचास व्यवस्थित होत नाही.

हृदयविकाराच्या झटक्यादरम्यान, एखाद्या व्यक्तीला डाव्या हाताच्या बाजूला वेदना जाणवते. वेदना अशी होते की संपूर्ण हातात मुंग्या येतात. या दरम्यान, खूप घाम येतो आणि छातीत वेदना उद्भवते.

आहारात बदल

ज्यांना ॲसिडिटीची समस्या आहे त्यांनी मसालेदार अन्न खाणे टाळावे.तसेच तळलेले पदार्थ खाऊ नयेत. हृदयविकाराच्या रुग्णाने तळलेल्या आणि चरबी वाढवणाऱ्या गोष्टी टाळाव्यात. कारण जास्त तेल खाल्ल्याने रक्त घट्ट होतं.

हृदयविकाराचे रुग्ण व्यायाम आणि योगा करू शकतात का?

हृदयविकाराच्या रुग्णांनी केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यायाम आणि योगा करावे. हे फक्त मर्यादित पद्धतीने करू शकतो.तथापि, प्रथम त्यांचे हृदय कशा प्रकारे कार्य करत आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. जर हृदयाचे कार्य चांगले असेल तर ते व्यायाम आणि योगा करू शकतात आणि हृदयावर वाईट परिणाम झाले असल्यास व्यायाम करू नये.व्यायाम करणे घातक ठरू शकते.

## गुळ खूप फायदेशीर आहे, वजन कमी करण्यापासून शरीराला डिटॉक्स करण्यापर्यंत, त्याचे इतर फायदे जाणून घ्या

पूर्वीच्या काळी लोक गोडधोडपणे खायचे, तरीही त्यांना मधुमेहासारखा कोणताही आजार नव्हता. याचे पहिले कारण म्हणजे ते लोक गूळ किंवा खंड वापरत असत, साखर नाही. दुसरे कारण ते मेहनत करायचे.शारीरिक श्रमामुळे शरीराच्या अतिरिक्त कॅलरीज बर्न होतात.मग ना वजन वाढण्याची चिंता असते ना कोणताही रोग होण्याची.

आजच्या आधुनिक काळात लोकांनी गुळाचा वापर मर्यादित केला आहे आणि साखरेने त्याची जागा घेतली आहे. खरंतर गूळ खूप फायदेशीर आहे. जर हे दररोज मर्यादित प्रमाणात वापरले गेले तर ते आपल्या शरीराला लठ्ठपणा व्यतिरिक्त सर्व रोगांपासून वाचवते.

**गुळाचे फायदे जाणून घ्या**

१- ऍनिमिया होण्यापासून प्रतिबंधित करते-गूळ हा आयरन चा उत्कृष्ट स्त्रोत आहे. जर तुमच्या शरीरात रक्ताची कमतरता असेल तर तुम्ही नियमितपणे गूळ खावे. हे हिमोग्लोबिन खूप वेगाने वाढवते आणि अशक्तपणा सारख्या समस्या टाळते.

२- वजन कमी करण्यासाठी उपयुक्त -साखरेच्या तुलनेत गुळामध्ये कॅलरीजचे प्रमाण खूपच कमी आहे, त्यामुळे वजन कमी करणाऱ्यासाठी हा उत्तम पर्याय आहे. या व्यतिरिक्त, ते शरीरात वॉटर रिटेंशन मुळे होणाऱ्या सूजची समस्या दूर करते. दररोज गुळाचे सेवन केल्याने आपले वजन नियंत्रणात राहते.

**३- पाचक प्रणाली सुधारते -जेवणानंतर**

थोडा गूळ खाल्ल्यास अन्न सहज पचते. गूळ व्हिटॅमिन आणि मिनरल इलेक्ट्रोलाइट संतुलन राखण्यास आणि मेटॅबॉलिझम सुधारण्यास मदत करतो. फायबर, प्रथिने आणि इतर आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असल्याने, गूळ खाल्ल्याने पाचन प्रणाली सुधारते आणि उलट्या, गॅस, अपचन यासारख्या समस्या उद्भवत नाहीत.

४- शरीराला डिटॉक्स करत - गूळ खाल्ल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात. हे रक्त शुद्ध करते आणि शरीरातील विषारी घटक काढून टाकते. गुळाच्या नियमित सेवनाने सर्दी-पडसे आणि शारीरिक अशक्तपणा सारख्या समस्या सुद्धा दूर होतात.

५- हाडे मजबूत करतात- गुळामध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस मुबलक प्रमाणात आढळतात. दोन्ही पोषक घटक हाडांसाठी चांगले मानले जातात. जर गुळाबरोबर दररोज आल्याचे सेवन केले तर सांधेदुखीला खूप आराम मिळतो.



## १ चमता तूप, प्रतिकारशक्ती वाढवण्यापासून ते वजन कमी करण्यापर्यंत फायदेशीर



तूप हा एक प्रमुख पदार्थ आहे, तो प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात सहज उपलब्ध आहे. हे दुधाचा वापर करून तयार केले जाते. तूप हे लोणी आहे जे सामान्यतः फॅटी मानले जाते. तथापि, आयुर्वेदानुसार, तुपाचे काही आश्र्चर्यकारक आरोग्य फायदे आहेत. हे अँटीऑक्सिडंट्स, निरोगी चरबींनी भरलेले आहे जे आपल्या एकूण आरोग्यासाठी चांगले आहेत.

सहसा लोक आपल्या आहारात तुपाचे सेवन सोडतात कारण त्यांना वाटतं याने वजन वाढतं. परंतु तुम्हाला माहिती आहे का की सकाळी उठल्यावर एक चमचा तूप खाल्ल्याने तुम्हाला अनेक फायदे मिळू शकतात. तर जाणून घेऊया.

सकाळी एक चमचा तुपाचे फायदे

१) तुपात जीवनसत्त्वे ए, डी, ई आणि के असतात जे आपल्या आतड्यांचे आरोग्य देखील वाढवतात. तूप आतड्यांच्या हालचाली सुधारण्यास देखील मदत करते. हे बद्धकोष्ठतेसारख्या कोणत्याही पाचन समस्या दूर ठेवते.

२) तूप शरीराला मजबूत बनवण्यास मदत करतं. हे आपल्या शरीरातून हानिकारक विष काढून टाकतं आणि रोग प्रतिकारशक्ती वाढवतं.

३) बाजारात उपलब्ध रिफाइंड तेलांपेक्षा तूप जास्त सुरक्षित आहे. एका अभ्यासानुसार, तूप शरीराचे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतं आणि चांगले कोलेस्टेरॉल वाढवतं.

४) ज्यांना सांधेदुखी आणि हाडांच्या समस्येने ग्रासले आहे, ते आपल्या दिवसाची सुरुवात तूपाने करू शकतात. तूप तुमचे सांधे वंगण घालते आणि सांधेदुखी टाळते.

५) आपल्या शरीराला योग्य कार्य करण्यासाठी आवश्यक जीवनसत्त्वे आणि पोषक तत्त्वे आवश्यक आहेत. तूप जीवनसत्त्वे आणि पोषक तत्वांनी समृद्ध आहे आणि यामुळे ते पोषणाचे पॉवरहाऊस बनते. सकाळी एक चमचा तूप खाल्ल्याने तुमच्या शरीराला हे सर्व पोषक घटक योग्य प्रकारे शोषण्यास मदत होते.

६) तुपात चरबी कमी असते आणि वजन कमी करण्यास मदत करते. हे पचविणे सोपे आहे, आपली पाचन प्रणाली सुधारते आणि वजन कमी करण्यास मदत करते. तुपात ब्युटीरिक ॲसिड आणि मध्यम-साखळीचे ट्रायग्लिसराइड्स असतात जे तुम्हाला शरीरातील जिद्दी चरबीपासून मुक्त होण्यास मदत करतात. तुपामध्ये अमीनो असिड्स असतात जे पोटातील चरबी कमी करण्यास मदत करतात.

## मधुमेह, नैराश्य कमी करण्यासाठी वटवृक्षाचे फळ उपयुक्त

वटवृक्ष: (Banyan Fruit) वटवृक्ष अत्यंत पूजनीय मानले जाते आणि हिंदू धर्मात त्याची पूजा केली जाते. प्रत्येकाला हे माहित आहे, पण वटवृक्ष आणि त्याची फळे आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर आहेत, हे फार कमी लोकांना माहित आहे. वटवृक्ष अनेक औषधी गुणांनी परिपूर्ण आहे आणि त्यात अनेक पोषक घटक आढळतात. दुसरीकडे, वडाची फळे खनिज ग्लायकोकॉलेट, अँटी-ऑक्सिडंट आणि वेदनशामक गुणधर्मांनी समृद्ध असतात. या फळांमध्ये प्रथिने, फायबर, कॅल्शियम आणि फॉस्फरस सारखे पोषक घटक देखील आढळतात. आज आम्ही तुम्हाला वटवृक्षाच्या आरोग्याशी संबंधित फायद्यांविषयी सांगत आहेत. वडाची फळे कोणत्या समस्यांवर मात करण्यास मदत करतात.



**नैराश्य (डिप्रेशन) कमी करते**

असे काही घटक वटवृक्षाच्या फळांमध्ये आढळतात जे मानसिक क्षमता वाढवण्यास मदत करतात. यासह, ते चिंता आणि तणावाची समस्या दूर करण्यासाठी देखील खूप प्रभावी आहेत. ही फळे डिप्रेशनची समस्या दूर करतात आणि मेंदूच्या नसांना आराम पोहोचवतात.

**अतिसार आणि पेचिशमध्ये आराम मिळतो**

अतिसार आणि पेचिश यासारख्या समस्या दूर करण्यासाठी वटवृक्ष देखील खूप उपयुक्त आहे. या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी, वडाचे फळ रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी त्याचे सेवन करा.

**रोगप्रतिकार शक्ती वाढवते**

वटवृक्ष फळ रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी खूप मदत करते. या फळात हेक्सेन सारखे घटक असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. ज्यामुळे आजारी पडण्याचा धोका अनेक पटीने कमी होतो.

**हृदयाचे आरोग्य राखते**

या फळामध्ये भरपूर पोटॅशियम आढळते, जे सोडियमची पातळी कमी करण्यासाठी प्रभावी आहे. हे शरीरातील रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. यामुळे हृदयाचे आरोग्य निरोगी राहते आणि हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

**मधुमेहाची समस्या कमी करते**

मधुमेहाची समस्या कमी करण्यासाठीही वटवृक्ष उपयुक्त आहे. यासाठी मधुमेही रुग्णाने त्याच्या फळाच्या पावडरचे सेवन करावे. जर तुम्हाला पावडर खायची नसेल तर ही फळे उकळल्यानंतर उकडलेले पाणीही प्यायले जाऊ शकते.

## असा असतो मलेरियाचा ताप, या लक्षणांकडे लक्ष न दिल्यास मृत्यूचा धोका

देशभरात डेंग्यूच्या वाढत्या रुग्णांदरम्यान मलेरियाच्या रुग्णांमध्येही वाढ होऊ लागली आहे. मलेरियाचा ताप हा डास चावल्यामुळे होतो. मलेरिया पसरवण्यासाठी अनेक परजीवी जबाबदार असतात. यापैकी सर्वात धोकादायक प्लास्मोडियम फॅल्सीपेरम आहे. हे इतके धोकादायक आहे की यामुळे मृत्यू देखील होतो. जर तुम्हाला सौम्य ताप, तीव्र डोकेदुखीसह थंडी वाजत असेल, तर मलेरियाच्या या धोकादायक प्रकाराची ही लक्षणे आहेत. ही लक्षणे दिसल्यास ताबडतोब रुग्णालयात जावे. या प्रकरणात निष्काळजीपणा जीवघेणा ठरू शकतो. मलेरियाची लागण झालेल्या व्यक्तीलाही एकाच वेळी दोन परजीवींचा संसर्ग होऊ शकतो, ही चिंतेची बाब आहे.

अशीच एक घटना नोएडामध्ये समोर आली आहे, जिथे प्लाझमोडियम वायवॅक्स सोबत मलेरियाचा सर्वात धोकादायक परजीवी प्लास्मोडियम फाल्सीपेरम देखील एका व्यक्तीमध्ये आढळून आला आहे. सध्या रुग्णाची तपासणी सुरू आहे. डॉक्टरांचे म्हणणे आहे की हजारो रुग्णांपैकी केवळ एका रुग्णामध्ये असे प्रकरण आढळतात. परंतु एकाच वेळी दोन संसर्ग होणे हे चिंतेचे कारण आहे. अशा परिस्थितीत लोकांनी मलेरियापासून स्वतःचा बचाव करणे गरजेचे आहे. या महिन्यांत मलेरियाच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने कोणत्याही प्रकारच्या तापाला हलके घेऊ नका. स्वतः औषध घेणे टाळा आणि उपचार घ्या.

याबाबत तज्ज्ञ स्पष्ट करतात




की मलेरियाचा ताप ॲनोफिलीस डास चावल्यामुळे होतो. जेव्हा हा डास माणसाला चावतो, तेव्हा प्लास्मोडियम बॅक्टेरिया शरीरात प्रवेश करतो. हळूहळू ते शरीरात वाढू लागते. दोन-तीन दिवसांनी ताप येऊ लागतो आणि हा जीवाणू शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर प्रभाव दाखवू लागतो. मलेरियाची लक्षणे वेळीच ओळखली गेली नाहीत, तर रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो.

मलेरियाच्या बाबतीत सुरुवातीला ताप येतो, घाम येणे सुरू होते आणि थोडीशी थंडीही जाणवते. ही त्याची सुरुवातीची लक्षणे आहेत. जर तुम्हाला ही समस्या येत असेल तर, मलेरियाची ताबडतोब चाचणी करा. या तापाची पुष्टी झाल्यास त्वरित उपचार करा.

**कसा रोखायचा मलेरिया**

घराभोवती पाणी साचू देऊ नका

स्वच्छतेची काळजी घ्या

घरात कीटकनाशकांची फवारणी करा

पूर्ण बाही असलेले कपडे घाला

## सावधान! ५० वर्षांखालील लोकांमध्ये वाढत आहे कॅन्सरचा धोका, जाणून घ्या का?




आजपर्यंतच्या सर्वात मोठ्या कर्करोगाच्या अभ्यासात असे आढळून आले आहे की कर्करोगाने ग्रस्त असलेल्या ५० वर्षांखालील लोकांची संख्या तीन दशकात जवळपास ८०% वाढली आहे. २०३० पर्यंत हा आकडा ३१% ने वाढेल असाही अंदाज आहे. स्कॉटलंडमधील एडिनबर्ग विद्यापीठ आणि हांगझोऊ येथील झेजियांग विद्यापीठाच्या मेडिकल स्कूलने केलेल्या संशोधनातून ही माहिती समोर आली आहे.

संशोधकांनी असा निष्कर्ष काढला की जगभरातील तरुण लोकांमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या १९९० मध्ये १.८२ दशलक्ष वरून २०१९ मध्ये ३.२६ दशलक्ष झाली आणि ३० ते ४० वर्षे व त्यापेक्षा कमी वयोगटातील लोकसंख्येमध्ये कर्करोगाच्या मृत्यूमध्ये २७% वाढ झाली.

२०१९ मध्ये, ५० वर्षांखालील लोकांमध्ये कर्करोगाचे सर्वाधिक प्रमाण उत्तर अमेरिका, ओशनिया आणि पश्र्चिम युरोपमध्ये होते. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्येही हीच परिस्थिती आहे. शिवाय, अशा राज्यांमध्ये कर्करोगाची सुरुवात पुरुषांपेक्षा स्त्रियांवर जास्त परिणाम करते. ओशनिया, पूर्व युरोप आणि मध्य आशियामध्ये उच्च मानवी मृत्यू दर आढळतात.

स्तनाचा कर्करोग, श्र्वासनलिका, फुफ्फुस, पोट आणि आतड्यांचा कर्करोग हे स्त्रियांमध्ये कर्करोगाच्या संशोधकांचे सर्वात सामान्य प्रकार आहेत. किडनी किंवा अंडाशयाचा कर्करोग असलेल्या लोकांमध्ये मृत्यूदरात तीव्र वाढ दिसून आली.

५० वर्षांखालील कर्करोगाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याचे कारण काय आहे हे संशोधकांना अद्याप पूर्णपणे तपासता आलेले नाही. जर्नल बीएमजे ऑन्कोलॉजीमध्ये, संशोधकांनी सांगितले की खराब आहार, अल्कोहोल आणि निकोटीनचा वापर, शारीरिक निष्क्रियता आणि लठ्ठपणा हे घटक असू शकतात. तत्पूर्वी, १ सप्टेंबर रोजी, युरोपियन मेडिकल सेंटर (EMC) मधील ऑन्कोलॉजी इन्स्टिट्यूटचे ऑन्कोलॉजिस्ट पावेल कोपोसोव्ह म्हणाले की, जनुकांमध्ये काही उत्परिवर्तन असतात, जे पिढ्यानपिढ्या जातात आणि कर्करोग होण्याची शक्यता वाढवतात.

BRC-1 आणि BRC-2 नावाच्या सर्वात सामान्य उत्परिवर्तनांमुळे स्त्रियांमध्ये स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग आणि पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचा विकास होऊ शकतो. डॉक्टरांनी असेही सांगितले की ट्यूमरचा उशीरा शोध ही मुख्य समस्या आहे, कारण ती बहुतेक वेळा लक्षणांशिवाय विकसित होऊ लागते आणि रोगाच्या शेवटच्या टप्प्यात रोग सुरू होतात.

## ४५०० वर्ष जुन्या या आजारावर नाही कोणताही इलाज, लस न घेतल्यास होतो रुग्णाचा मृत्यू




नुकतेच गाझियाबादमध्ये एका मुलाचा रेबीजने मृत्यू झाला. या मुलाचा काही दिवसांपूर्वी एका कुत्र्याने चावा घेतला होता, मात्र ही माहिती त्याने कोणालाही दिली नव्हती. यामुळे, रेबीज प्रतिबंधक लस दिली जाऊ शकली नाही आणि काही दिवसांनंतर रेबीज संसर्गामुळे मुलाचा मृत्यू झाला. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार रेबीज हा ४५०० वर्षे जुना आजार आहे, परंतु आजपर्यंत त्यावर कोणताही इलाज नाही. म्हणजेच एखाद्याला रेबीजचा आजार झाला, तर त्या रुग्णावर उपचार करता येत नाहीत. रेबीजचा संसर्ग मेंदूत गेल्यास रुग्णाचा मृत्यू होतो. या आजाराची लक्षणे काही महिन्यांनी किंवा वर्षांनंतरही दिसू शकतात. लक्षणे दिसू लागल्यानंतर, रुग्णाची स्थिती बिघडते आणि नंतर मृत्यू होतो.

रेबीज रोगाची ९५% प्रकरणे फक्त कुत्रा चावल्यामुळे होतात. अनेक प्रकरणांमध्ये कुत्रा चावल्यानंतर लोक घरगुती उपाय करू लागतात. परंतु या आजाराचे विषाणू कोणत्याही प्रकारच्या घरगुती उपायांनी नष्ट होऊ शकत नाहीत. या आजारापासून बचाव करण्यासाठी केवळ रेबीजविरोधी लस प्रभावी आहे. एखाद्या व्यक्तीला कुत्रा चावला असेल आणि जखम झाली असेल तर लवकरात लवकर लसीकरण करा, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. २४ तासांच्या आत लस घेण्याचा प्रयत्न करा. यापेक्षा जास्त विलंब करणे योग्य नाही.

याबाबत तज्ज्ञ सांगतात की, कुत्रा चावल्यावर आधी जखम आहे की नाही हे पाहा. जर जखम नसेल, तर काळजी करण्यासारखे काही नाही. पण जखम असेल, तर आधी धुवावी. या दरम्यान, कोणत्याही घरगुती उपायाच्या आहारी जाऊ नका आणि ताबडतोब डॉक्टरांना भेटा. कुत्रा चावल्यानंतर थोडीशी ओरखडे असलेली जखम झाली, तरी रेबीज प्रतिबंधक लस घेणे आवश्यक आहे. कारण रेबीजचा विषाणू कुत्र्याच्या लाळेमध्ये असतो. ही लाळ व्यक्तीच्या त्वचेतून रक्ताच्या संपर्कात आल्यास रेबीजची लागण होण्याचा धोका असतो.

जर एखाद्या पाळीव कुत्र्याला रेबीज विरूद्ध लसीकरण केले गेले नसेल, तर ते मानवांना देखील रेबीज संसर्गास कारणीभूत ठरू शकते. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारे बेफिकीर राहू नका. पाळीव कुत्रा चावला असेल तरीही लसीकरण जरुर करुन घेणे.

## 'दिव्यांग कल्याण विभाग, दिव्यांगाच्या दारी' अभियानांतर्गत 'गुगल फॉर्म'मध्ये दिव्यांगांची माहिती सादर करण्याचे आवाहन

लातूर : 'दिव्यांग कल्याण विभाग, दिव्यांगाच्या दारी' या अभियाना अंतर्गत दिव्यांग व्यक्तींच्या नाव नोंदणीसाठी 'गुगल फॉर्म'मध्ये माहिती सादर करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींची माहिती शासन स्तरावरून दिव्यांगाच्या कल्याण व पुनर्वसनाच्या योजनांसाठी आवश्यक आहे. यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींची नोंदणी https://forms.gle/xCFQQCyZeUBsipTt9 या गुगल लिंक वर भरून सादर करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

## डॉ. बालाजी कांबळे यांच्या लघु संशोधन प्रकल्पास विद्यापीठाची मंजुरी

लातूर: येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील आयक्यूएस्सी समनव्यक डॉ.बालाजी कांबळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने लघु संशोधन प्रकल्पास मंजुरी दिली असून प्रकल्प दोन वर्षामध्ये पूर्ण करून विदयापीठास सादर करावयाचा आहे. A Study of Financial Literacy and Investment behavior of Working women in Higher Education Institutions in Latur District. या विषयावरील संशोधन प्रकल्पास मंजुरी मिळाल्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम पवार, उपप्रचार्य डॉ. गणेश लहाने वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर, नॅक समन्वयक डॉ. बी.टी.चव्हाण आदी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## टोईंग वाहनावरील महिला कर्मचाऱ्यास मारहाण; गुन्हा दाखल

लातूर : टोइंग वाहनावरील महिला कर्मचाऱ्यास शिवीगाळ व मारहाण प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शहरातील नागरिकांनी असे प्रकार टाळावेत.वाहतुकीचे नियम पाळावेत,असे आवाहन मनपा आयुक्तांनी केले आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने विश्व एंटरप्राइजेस यांना वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने काम देण्यात आलेले आहे. नो पार्किंग झोनमध्ये उभ्या वाहनांना जामर लावणे,दंड वसूल करणे अशी कामे ही एजन्सी करते. बुधवारी (दि.६ सप्टेंबर) सायंकाळी सुभाष चौकात एका व्यक्तीने नो पार्किंग झोन मध्ये दुचाकी लावली. एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी या दुचाकीस जामर लावले.त्यावेळी संबंधित अनोळखी व्यक्ती व दोन महिलांनी एजन्सीच्या कर्मचारी बालिका कांबळे यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ तसेच मारहाणही केली.यात त्यांच्या हाताला दुखापत झाली आहे.कांबळे यांनी यासंदर्भात गांधी चौक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यावरून अनोळखी व्यक्तींच्या विरोधात खझ्झ कलम ३२५, २९४, ३२३, ५०४, ५०९ व ३४ नुसार गुन्हा आला आहे.

शहरातील वाहतूक सुरळीत करून नागरिकांचा त्रास कमी करण्यासाठी मनपा व वाहतूक पोलिसांच्या वतीने विविध उपाय योजना केल्या जात आहेत.नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळून मनपास सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

वेगाने विकसित होणाऱ्या लातूर शहरात वाहनांची संख्या मोठी आहे.वाहनधारक सार्वजनिक ठिकाणी व बाजारपेठेत आल्यानंतर पार्किंगची समस्या निर्माण होते.त्यावर तोडगा काढण्यासाठी मनपाने पार्किंगसाठी ठिकाणे निश्चित केली आहेत. नागरिकांनी तेथेच आपली वाहने पार्क करावीत. वाहतूक सुरळीत रहावी, यासाठी मुख्य रस्त्यावर पिवळे पट्टे मारण्यात आले आहेत.या पिवळ्या पट्ट्याच्या आतील बाजूस नागरिकांनी वाहन सोडणे आवश्यक आहे.पिवळ्या पट्ट्याच्या बाहेर वाहन सोडून वाहतुकीस अडथळा केला तर संबंधित वाहनास जामर लावून दंड आकारला जातो. नागरिकांनी आपली वाहने ठरवून दिलेल्या ठिकाणी,पिवळ्या पट्ट्याच्या आतील बाजूसच पार्क करावीत. वाहतुकीस अडथळा होईल अशा ठिकाणी आपली वाहने उभी करू नयेत. सध्या सणासुदीचे दिवस आहेत.त्यामुळे बाजारपेठेत मोठी गर्दी आहे.अशा स्थितीत वाहतूक सुरळीत राहण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.दंडात्मक कारवाई होणार नाही याची दक्षता घ्यावी,असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# गणेशोत्सव काळात सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करावे

### –क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे



लातूर : गणेशोत्सव काळात गणेशोत्सव मंडळांना आवश्यक परवानग्या तातडीने मिळण्यासाठी, तसेच या काळात कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आदेश क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिले. उदगीर शासकीय विश्रामगृह येथे आयोजित विविध शासकीय विभागांच्या बैठकीत ना. बनसोडे बोलत होते.

माजी आमदार गोविंदराव केंद्रे, तहसीलदार रामेश्र्वर गोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपविभागीय कृषि अधिकारी एन. आर. काळे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार, महावितरणचे उप कार्यकारी अभियंता सायस दराडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एल. डी. देवकर, ग्रामीणचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार, शहर पोलीस निरीक्षक परमेश्र्वर कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

उदगीर शहर आणि तालुक्यात कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच उदगीर नगरपालिकेने शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमरे बसवावेत. गणेशोत्सव मंडळांना आवश्यक परवानग्या देण्यासाठी महसूल पोलीस प्रशासन, नगरपरिषद, महावितरण यांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

नगरपरिषदेने शहरातील स्वच्छतेसाठी उपाययोजना कराव्यात. भूमिगत गटार योजनेचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करण्यासाठी सर्वेक्षण आणि इतर कामांना गती द्यावी. या प्रस्तावासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याल प्राधान्य द्यावे, असे ना. बनसोडे यांनी यावेळी सांगितले. तसेच नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला.

उदगीर तालुका क्रीडा संकुलामध्ये खेळाडूंना मुंबई, पुण्याच्या धर्तीवर क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी तयार करण्यात येत असलेल्या प्रस्तावाचा क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आढावा घेतला. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू घडण्यासाठी त्यांना अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.

## ना. संजय बनसोडे यांनी जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या ;तातडीने कार्यवाही करण्याच्या संबंधित विभागांना सूचना



लातूर : क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर शासकीय विश्रामगृह येथे तालुक्याच्या विविध भागातून आलेल्या नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच याठीकणी उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांना या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करून समस्यांचा निपटारा करण्याच्या सूचना ना. बनसोडे यांनी दिल्या.

माजी आमदार गोविंदराव केंद्रे, तहसीलदार रामेश्र्वर गोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपविभागीय कृषि अधिकारी एन. आर. काळे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार, महावितरणचे उप कार्यकारी अभियंता सायस दराडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एल. डी. देवकर, ग्रामीणचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार, शहर पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी नागरिकांनी प्रामुख्याने ग्रामीण भागातील रस्ते, पाणी पुरवठ्याच्या समस्या, महावितरणशी संबंधित समस्या, शहर व गावातील अंतर्गत रस्ते, वैद्यकीय मदत आदी विषयाच्या समस्या, निवेदने सादर केली. ना. बनसोडे यांनी प्रत्येकाशी संवाद साधून त्यांची समस्या जाणून घेतल्या. तसेच या समस्या तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## छतावरील सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या वीज ग्राहकांची संख्या एक लाखाच्या पार

मुंबई : छतावर सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करणाऱ्या राज्यातील वीज ग्राहकांच्या संख्येने नुकताच एक लाखाचा आकडा ओलांडला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मा. लोकश चंद्र यांनी दिली.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी सौर ऊर्जानिर्मितीवर भर देण्याच्या सूचना दिल्या आहेत. छतावरील सौर ऊर्जा निर्मिती अर्थात रूफ टॉप सोलर प्रकल्पामुळे निर्माण होणारी वीज वापरल्यामुळे संबंधित ग्राहकाचे वीजबिल कमी होते. गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाली तर ती नेट मिटरिंगद्वारे महावितरणला विकून नंतरच्या बिलात सवलत मिळविता येते. यामुळे रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविलेल्या ग्राहकांना कधी कधी शून्य वीजबिलही येते.

राज्यात ६ सप्टेंबर रोजी रूफ टॉप सोलर वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या १,०४,०३५ झाली आहे व एकूण वीजनिर्मिती क्षमता १,६५६ मेगावॅट इतकी झाली आहे. ही एकत्रित क्षमता एखाद्या मोठ्या औष्णिक किंवा जलविद्युत प्रकल्पाएवढी आहे.

राज्यात २०१६ – १७ या आर्थिक वर्षात केवळ १,०७४ ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले होते व त्यांची एकूण क्षमता २० मेगावॅट होती. त्यानंतर महावितरणच्या प्रयत्नांमुळे राज्यात रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांची संख्या झपाट्याने वाढत गेली. २०१९ – २० या आर्थिक वर्षात अशा ग्राहकांची संख्या २६,०१७ झाली व एकूण क्षमता ५१२ मेगावॅटवर पोहोचली. दोनच वर्षात २०२१ –२२ या आर्थिक वर्षात या ग्राहकांची संख्या ५५,७९८ झाली व एकूण वीजनिर्मिती क्षमता १,०१७ मेगावॅट झाली. २०२१ – २२ ते २०२१ –२२ या एका आर्थिक वर्षात रूफ टॉप सोलरद्वारे होणाऱ्या वीजनिर्मिती क्षमतेत ४२१ मेगावॅटची भर पडली. रूफ टॉप सोलर प्रकल्पांसाठी घरगुती ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. महावितरण ग्राहकांना हे प्रकल्प बसविण्यासाठी मदत करते. महावितरणच्या https://www.mahadiscom.in/ismart या वेबसाईटवर याविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

सर्वसाधारणपणे एखाद्या कुटुंबाला ३ किलोवॅटचा सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प पुरेसा ठरतो. त्यासाठी सरकारकडून सुमारे ४३ हजार रुपये ते ५६ हजार रुपये अनुदान मिळते. तीन किलोवॅट ते दहा किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पांना तीन किलोवॅटनंतर प्रत्येक किलोवॅटला सुमारे सात ते नऊ हजार रुपये अनुदान मिळते. वैयक्तिक वीज ग्राहकांसोबतच हाऊसिंग सोसायट्याही रूफ टॉप सोलर योजनेचा लाभ घेतात व त्यांनाही अनुदान मिळते.


**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER. **GOURI HANUMANT KINIKAR TO: GAURI HANUMANT KINIKAR** HENCE FOR THE DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **GAURI HANUMANT KINIKAR** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE.

**OLD NAME : GOURI HANUMANT KINIKAR**
**NEW NAME : GAURI HANUMANT KINIKAR**
**ADDRESS :** KINIKAR HOUSE, BANDHKAM BHAVAN, SHAHUPURI COLONY, AUSA ROAD, LATUR (413512)


## मिरज येथील शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह संस्थेत दिव्यांगासाठी मोफत संगणकीय आणि व्यावसाईक प्रशिक्षणाची संधी

लातूर : शासनाचे दिव्यांग कल्याण आयुक्तालय आणि सांगली जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत मिरज येथील शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह ही संस्था प्रौढ दिव्यांगासाठी मोफत प्रशिक्षण देणारी शासकीय संस्था आहे.

या संस्थेतील प्रशिक्षण वर्गांना महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाची मान्यता आहे. या संस्थेला अखिल भारतीय स्तरावरील एफआयसीसीआय अवार्ड १९९९ प्राप्त झाला आहे. या संस्थेत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देणे सुरु आहे. मोजक्याच जागा असल्याने ग्रामीण व शहरी भागातील गरजू दिव्यांग यांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहन शासकीय प्रौढ अपंग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृहाचे अधीक्षक यांनी केले आहे.

**दिव्यांगासाठी प्रशिक्षण कालावधी व वयोमर्यादा**

सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन वुईथ एम.एस. ऑफिस (संगणक कोर्स) यासाठी शैक्षणिक पात्रता आठवी पास तर मोटार अॅन्ड आर्मेचर वायडींग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज (इलेक्ट्रीक कोर्स) साठी किमान नववी पास शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. १६ वर्षे ते ४० वर्षे वयोमर्यादेतील दिव्यांगांना प्रवेश दिला जाईल. प्रशिक्षण कालावधी एका वर्षाचा राहील.

प्रशिक्षण कालावधीत राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची मोफत सोय, अद्यावत व परीपूर्ण संगणक कार्यशाळा, भरपूर प्रॅक्टीकल्स व व्यवसायाभिमुख मोफत प्रशिक्षण, इंटरनेटची सुविधा, अनुभवी व तज्ज्ञ निदेशक, उज्वल यशाची परंपरा, समाज कल्याण विभागाकडून स्वयंरोजगारासाठी व्यवसायासाठी बीज भांडवल योजना या सोई व सवलती दिव्यांगाना प्रशिक्षणादरम्यान देण्यात येणार आहेत.

**अर्ज केंव्हा, कसे व कोठे करावा**

प्रवेश अर्ज व माहितीपत्रक अधीक्षक, शासकीय प्रोढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्याजवळ, मिरज ता. मिरज जि.सांगली पिन कोड:- ४१६४१० येथे समक्ष मोफत मिळतील. अधिक माहितीसाठी ०२३३-२२२२९०८ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा ९९२२५७७५६१ किंवा ९५९५६६७९३६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. प्रवेशासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही. प्रवेश अर्ज पूर्णपणे भरुन फोटोसह संस्थेकडे पाठवावेत किंवा समक्ष भरुन द्यावेत.

प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, एसएससी मार्कशिट व प्रमाणपत्र, दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्ज संस्थेकडे पाठवावेत. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ज्ञ समितीद्वारे मुलाखती घेऊन प्रवेश देण्यात येईल, असे शासकीय प्रौढ अपंग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृहाचे अधीक्षक यांनी कळविले आहे.


छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरुपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९





SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते




## दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी मध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

लातूर : दयानंद शिक्षण संस्थेद्वारा संचलित, दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी,लातूर येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक मंगळवारी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी प्रथम ते तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या तासिका घेतल्या व एकदिवसीय शिक्षक होण्याचा अनुभव घेतला. तर काही विद्यार्थ्यांनी गुरुजनांबद्दल कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या. आणि काही विद्यार्थांनी गायनाच्या माध्येमातून शिक्षकांची स्तुती केली. यावेळी महाविद्यलयातील प्राचार्य डॉ. चाऊस यांनी शिक्षकांच विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्व तसेच शिस्त, व्यक्तिमत्व विकास, मोबाईलचा जीवनावर झालेला परिणाम आणि दुष्परिणाम, ध्येये साध्य करण्यासाठी करावयाचे प्रयत्न इ. अनेक विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रा. पांचाळ सुष्मा यांनी पारंपारिक काळापासून चालत आलेलं गुरु आणि शिष्याच नातं कसं असतं याविषयी विविध दाखले देत आपला सांस्कृतिक वारसा जोपासण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांच्या कला- गुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यात बेस्ट टीचर आवार्ड शुभांगी जाधव, बेस्ट स्पीच अवार्ड सुदर्शन जोशी आणि वैष्णवी पाटील तर बेस्ट गायक अवार्ड शेख साईमा यांना मिळाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भोसले वैष्णवी यांनी केले. सूत्रसंचालन निकिता डोंगरे व श्र्वेता देशमुख यांनी केले. आभार पाठक कल्याणी यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जगदीश रेड्डी, सिद्धांत मानखेडकर, ढोबळे पदमजा,भोसले वैष्णवी, पोटे नेहा, पाटील वैष्णवी, चौधरी स्नेहा, बंगाळ दिव्या,गबाळे आकांक्षा, यांनी परिश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्तिथ होते.

## सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या मोफत पूर्वप्रशिक्षणाची सुवर्णसंधी

### जिल्हा सैनिक कल्याण केंद्रात २५ सप्टेंबर रोजी मुलाखतीचे आयोजन

लातूर : भारतीय सशस्त्र सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या परीक्षेची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी नाशिक येथील नाशिक रोडच्या छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये राज्य शासनातर्फे राज्यातील नवयुवक व नवयुवतींसाठी ३ ऑक्टोबर २०२३ ते १२ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ५४ आयोजित करण्यात येत आहे. या कोर्ससाठी प्रशिक्षणार्थीची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची निःशुल्क सोय करण्यात येणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात २५ सप्टेंबर २०२३ रोजी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी केले आहे.

मुलाखतीस येताना डिपार्टमेंट ऑफ सैनिक वेलफेअर (डीएसडब्ल्यू) यांच्या संकेतस्थळावर सर्च करून त्यामधील एसएसबी-५४ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) किंवा व्हाटसअप क्रमांक ९१५६०७३३०६ वर एसएसबी ५४ हा मेसेज केल्यास कोर्ससाठी परिशिष्ट उपलब्ध करुन दिले जाईल. शिफारस पत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट यामधील माहिती पूर्ण भरून सोबत येऊन यावे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये एस.एस.बी कोर्ससाठी प्रवेश मिळण्यासाठी नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येतांना सोबत घेवून यावेत.

उमेदवार कंम्बाइंड डिफेंस सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएसई-युपीएससी) अथवा नॅशनल डिफेंस ॲकडमी एक्झामिनेशन (एनडीए-युपीएससी) पास झालेली होवून सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेला असावा. एनसीसी 'सी' सर्टिफिकेट 'ए' किंवा 'बी' ग्रेडमध्ये पास झालेले आणि एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस. एस. बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. युनिवर्सिटी एन्ट्री स्कीमसाठी एस.एस.जी कॉल लेटर असावे. शिफारस केलेल्या यादीत नांव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी: ीरळपळपस.लिंीलपरीहळज्ञसारळश्र.लो अथवा ०२५३-२४५१०३२ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा ९१५६०७३३०६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून लातूर जिल्ह्यातील नवयुवक व नवयुवतींनी या संधीचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री. पांढरे यांनी केले आहे.